# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र . मऔविम/भूविभाग/म.व्य(भूमी)/C 52073

"उद्योग सारथी"
मरोळ औद्योगिक क्षेत्र
महाकाली गुंफा मार्ग
अंधेरी(पूर्व),मुंबई-९३
दिनांक :- 09.08.2016

## परिपत्रक

विषय :- **महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील बंद आस्थापना/कंपन्या/कारखाने/ गिरण्या यांच्या जमिनीच्या वापरातील बदलासाठी, विकासासाठी, विक्रीसाठी/ हस्तांतरासाठी कामगार आयुक्त यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेबाबत..**

संदर्भ :- १. मऔविम/विधी व कामकाज/A ३४८१८ दि. २९.०१.२०१४

शासन निर्णय दिनांक २३.१०.२००७, दिनांक ३०.१०.२००७ व दि. १२.०१.२००९ अन्वये शासनाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार बंद आस्थापना/कंपन्या/कारखाने/गिरण्या यांचे जमिनीच्या वापरातील बदलासाठी/विकासासाठी/विक्रीसाठी/हस्तांतरापूर्वी त्यातील कामगारांची देणी पूर्णपणे अदा करण्यात आली असल्याबाबत कामगारा आयुक्तांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असल्याने सदर आदेशांची महामंडळाकडून अंमलबजावणी करणेत येत होती. तथापि कामगार आयुक्तांचे ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यास बराच कालावधी लागत असल्याने हस्तांतर व अनुषंगिक बाबीवरील कार्यवाही प्रलंबित राहत असल्याने सदर बाबीचा विचार महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. ०८.११.२०१२ च्या ३४७ व्या बैठकीत तसेच दि. २७.११.२०१३ च्या ३५३ व्या बैठकीत करण्यात येवून पारीत ठराव क्र. ५१३७ तसेच ५२७८ नुसार संदर्भिय पत्रान्वये महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील बंद आस्थापना/कंपन्या/कारखाने गिरण्या यांच्या जमिनीच्या वापरातील बदलासाठी/ विकासासाठी/ विक्रीसाठी/ हस्तांतरणासाठी प्रस्ताव प्राप्त झालेवर कामगार आयुक्त यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेबाबत संबंधित प्रादेशिक अधिका-याकडून तात्काळ कामगार आयुक्तांना पत्र देऊन ४५ दिवसांत संबधित असलेल्या कामगारांचे देय असलेल्या रकमांबाबत ना हरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती करण्यात येत होती व असे प्रमाणपत्र जर ४५ दिवसांत कामगार आयुक्तांकडून प्राप्त झाले नाही तर नंतर त्याची वाट न पाहता कामगारांची देणी देण्याची जबाबदारी

संबंधित खरेदीदार उद्योजकावर राहिल असे प्रतिज्ञापत्र हस्तांतर प्रकरणी खरेदीदाराकडून व विषयांकित इतर प्रकरणात भूखंडधारकाकडून घेवून वापराच्या बदलाच्या/हस्तांतराच्या/विकासाच्या प्रकरणावर महामंडळाच्या धोरणानुसार प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

तथापि शासनाच्या Ease of Doing Buisiness,Make in Maharashtra आणि Make in India या धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता बंद आस्थापना/कारखाने/कंपन्या गिरण्या यांच्या जमिनीचा विकास/विक्री/हस्तांतरण करतांना त्यांचेकडील कार्यरत कामगारांची कोणतीही कायदेशिर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे कामगार विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत सहजता, सुलभता व सुटसुटीतपणा आणण्याकरीता शासनाने शासन निर्णय क्र. नाहप्र-२००७/प्र.क्र. ४७७१/काम-२ दिनांक १८.०५.२०१६ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार यापुढे खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. मऔवि महामंडळ क्षेत्रातील आस्थापना/कंपन्या/कारखाने व त्यांचे भूखंड हस्तांतरीत करतांना संबंधित आस्थापना/कंपन्या/कारखाना यामधील कामगारांची कायदेशिर देणी न्यायिक प्राधिकरण/ उच्च न्यायालय/ सर्वोच्च न्यायालय/ शासकीय प्राधिकारी यांच्या आदेशाने देय असल्याचे/ प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यास, ती पुढील तीन वर्षात अदा करण्याबाबत नविन उद्योजकाकडून व जुन्या उद्योजकाकडून/मालकाकडून(उपलब्ध असल्यास) रु.३००/- च्या स्टॅम्पपेपरवर(नोटराईज्ड) शपथपत्र/ हमीपत्र /बंधपत्र घेवून अशा आस्थापना/ कारखाने /कंपन्या व त्यांचे भूखंड नविन उद्योजकास केवळ उद्योगाच्या प्रयोजनाकरीता हस्तांतरीत करण्यात यावेत.

२. उक्त हमीपत्र/शपथपत्र/बंधपत्र नविन उद्योजक/ मालक आणि जुने उद्योजक/मालक(उपलब्ध असल्यास) हयांनी कामगार आयुक्त यांना देखील सादर करावे व त्याची छायांकित प्रत महामंडळास सादर करावी.

३. भूखंड उद्योगाच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनाकरीता उपयोगात/वापरात आणले जात असल्याची बाब निदर्शनास आल्यास तसेच कामगारांची कायदेशीर देणी अदा झाली नसल्याचे कामगार विभागाच्या निदर्शनास आल्यास, कामगार आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार अशा आस्थापना/कंपन्या/कारखाने व त्यांचे भूखंड यांचे हस्तांतरण रद्द करण्याची कायदेशीर कार्यवाही महामंडळ करेल

४. परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील आस्थापना/कारखाने/ गिरणी/कंपनी व त्यांचे भूखंड उद्योगाच्या प्रयोजना व्यतिरिक्त इतर प्रयोजनाकरीता हस्तांतरण/विकास/विक्री

करावयाचे असल्यास त्यांना शासन निर्णय क्रमांक- नाहप्र-२००७/प्र.क्र.४७७१/कामगार-२ दिनांक ३०.१०.२००७ व दिनांक १२.०१.२००९ च्या तरतुदीनुसार कामगारांची देणी पूर्णपणे अदा करण्यात आली असल्याबाबत कामगार आयुक्तांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

उपरोक्त कार्यवाहीचा निर्णय महामंडळाकडे प्राप्त प्रलंबित प्रकरणांस देखील लागू राहिल तसेच संदर्भिय परिपत्रक क्र. मऔविम/ विधी व कामकाज/A ३४८१८ दि. २९.०१.२०१४ याव्दारे रद्द करणेत येत आहे.

सदर परिपत्रक मा. मु.का.अ. यांचे संमतीने निर्गमित करणेत येत आहे.

**(ए. एल. जऱ्हाड)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मऔविम, मुंबई**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी/सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
५. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
६. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
७. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
८. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१०. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
११. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१२. सर्व औद्योगिक संघटना.
१३. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई.

**Format for Purchaser**

## Indemnity Bond Cum-Affidavit

THIS INDEMINITY BOND, is made and entered into at__________ this day of _______ 20____ by Shri. _____________, aged_________ years, Indian Inhabitant residing at ________________________ do hereby state on Solemn affirmation and Indemnify as under:

I, the Owner/Director/Chairman/authorized Signatory/Authorized representative of the M/s. (New Establishment name and address)________, I have purchased/Undertaken to use, the Industrial Plot No._____ in ________ Industrial Area of M/s. (Establishment Name and Address)_________________ admeasuring_______ sq. mtr. for Industrial purpose.

Since all the dues of the _________ workers amounting Rs._________ are settled/total amount of Rs. _________ equivalent to the workers entire legal and VRS dues are deposited before____________ Authority of Court and no liability is outstanding on my Company.

In this regard, I hereby undertake that if any cases are filed by the workers before any Government Authority or before any judicial Forum and any liability of the workers finally decided and if any liability arises on the Company(Establishment name) ____________________ after the Government Authority/Court ruling, I as a owner/Director/Chairman/authorized Signatory/Authorized representative of the Company(Establishment name)_________ shall discharge this liability fully, also I/We declare that this Bond shall be binding on me, my heirs and assignees.

IN WITNESS WHEREOF I HAVE Put my signature to these present on this day of ____________ 20

(_________________)

Witnesses :-

1)

2)

**Format for seller**

## Indemnity Bond Cum-Affidavit

THIS INDEMINITY BOND, is made and entered into at__________ this day of _______ 20____ by Shri. _____________, aged_________ years, Indian Inhabitant residing at ________________________ do hereby state on Solemn affirmation and Indemnify as under:

I, the Owner/Director/Chairman/authorized Signatory/Authorized representative of the M/s. (Establishment name and address)________, I have undertake to use/transfer the Industrial Plot No._______ in ________ Industrial Area of M/s. (Establishment Name and Address)_________________ admeasuring_______ sq. mtr. in the name of (New Establishment Name and Address)__________________for Industrial purpose.

Since all the dues of the __________ workers amounting Rs._________ are settled/total amount of Rs. _________ equivalent to the workers entire legal and VRS dues are deposited before____________ Authority of Court and no liability is outstanding on my Company.

In this regard, I hereby undertake that if any cases are filed by the workers before any Government Authority or before any judicial Forum and any liability of the workers finally decided and if any liability arises on the Company(New Establishment name) ____________________ or on the Company(Old Establishment Name)_____________after the Government Authority/Court ruling, I as a owner/Director/Chairman/authorized Signatory/Authorized representative of the Company(New Establishment name)_________ shall discharge this liability fully, also I/We declare that this Bond shall be binding on me, my heirs and assignees.

IN WITNESS WHEREOF I HAVE Put my signature to these present on this day of ____________ 20

(_________________)

Witnesses :-

1)

2)